६०

अति.महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका,
जावक क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/१३५७
दिनांक :-२७/६ /२०२१

**-: कार्यालयीन परिपत्रक :-**

विषय – पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील शिक्षक संवर्गातील विविध पदावरील कार्यरत सेवकांची सेवाज्येष्ठता यादी अंतिम करून प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ – १. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र.एस.आर.व्ही२०११/प्र.क्र.२८४/१, दि.२१/१०/२०११

२. कार्यालय परिपत्रक अतिरिक महापालिका आयुक्त (ज) कार्यालय, जा क्र. अतिमआ (ज)/साप्रवि/१/आस्था/शिविप्रा/ दि. ०१/०४/२०२१

३ .मा. अतिरिक महापालिका आयुक्त (ज)ठराव क्र.९१२७ दिनांक - १७/०६/२०२१

पुणे महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाकडील मराठी,उर्दू,इंग्रजी व कन्नड माध्यमाच्या पर्यवेक्षक, मुख्याध्यापक, शिक्षक, चित्रकला शिक्षक, संगीत शिक्षक या पदाची संदर्भ क्र.२ च्या कार्यालयीन परिपत्रकानुसार प्रारूप सेवाज्येष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आलीआहे.

संदर्भ क्र.२ चे कार्यालय परिपत्रकास अनुसरून प्राथमिक शिक्षण विभागाकडील 'उपरोक्त' पदावरील कार्यरत सेवकांनी स्वत:चे नाव,जात जातीचा गट,शैक्षणिक पात्रता,जन्मदिनांक,नेमणुकीचा दिनांक इत्यादी सर्व बाबीची तपासणी करून आपल्या नावासमोर स्वाक्षरी करून यादीमधील आपल्या नोंदीबाबत काही आक्षेप/चूक असल्यास त्याबाबत लेखी स्वरूपात आक्षेप नोदविणेस कळविणेत आले आहे.त्यानुसार शैक्षणिक पात्रते संबंधी असणाऱ्या आक्षेपाची उचित पूर्तता करणेत आली आहे.

संदर्भ क्र.२चे कार्यालय परिपत्रकास अनुसरून सेवाजेष्टतेबाबत प्राप्त हरकतीचा शासन निर्णय, नियम परिपत्रके,यानुसार सोबतचे तक्त्यामध्ये नमूद पदावरील सेवकाचे नाव,पत्र संदर्भ व दिनांक, सेवाजेष्टता यादीवरील हरकत/आक्षेपाचे संक्षिप्त स्वरूप,प्रशासकीय निर्णय या स्वरुपात सादर केलेली असून ती सेवाजेष्टता यादी अंतिम करून प्रसिद्ध करणेस,संदर्भ क्र.३ चे ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

प्राथमिक शिक्षण विभागाकडील आस्थापनेवरील मूळ जिल्हा परिषदेकडील उपशिक्षकांनी सेवाजेष्टताबाबत मे.उच्च न्यायालयात मुबंई येथे दाखल याचिका क्र.६१६१/ २०१८ सेवाजेष्ठताबाबत कोर्टकेसचा निकाल प्रलंबित असून मे.उच्चन्यायालयाच्या अंतिम निर्णयास अधिन राहून प्राथमिक शिक्षण विभागाकडील आस्थापनेवरील मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापक,उपशिक्षक यांची अंतिम सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदरची यादी दिनांक ३१/१२/२०२० अखेर पर्यत सुधारित करून अंतिम करण्यात येत असून शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिका कार्यालय परिपत्रक व्यवस्थापन प्रणालीवर संबंधिताचे माहितीसाठी उपलब्ध आहे.

संबंधित खातेप्रमुख यांनी या कार्यालय परिपत्रकाची समज त्यांचे नियंत्रणाखालील विषयांकित संवर्गातील अधिकारी / सेवक यांना देऊन संबंधिताना त्याप्रमाणे अवगत करावे.

तरी संबंधित खातेप्रमुख, प्रशासन अधिकारी यांनी वरीलबाबत जरूर ती पुढील तजवीज करावी.

Rubal 16/6/21
(रुबल अग्रवाल)
अति.महापालिका आयुक्त(ज)
पुणे महानगपालिका

प्रति – संबंधित खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी,
पुणे महानगरपालिका
यांजकडेस योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित ---